# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयकुत्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३७५/२०२३ दिनांक – २५/१०/२०२३

## Credit Card द्वारे फसवणूक रक्कम रु. १,३२,०००/- परत करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर परिसरातील इसम नामे श्री. प्रफुल प्रदिप सुर्वे रा. नायगांव, वसई पुर्व, यांना अनोळखी व्यक्तीने फोन करुन त्यांचे ॲक्सीस बँक क्रेडिट कार्डाची माहिती अपडेट करावयाचे सांगितले. तक्रारदार यांचेकडुन क्रेडिट कार्डाची माहिती घेवुन क्रेडिट कार्डाचे खात्यातुन एकुण १,३२,०००/- रुपये काढुन घेवुन फसवणुक केल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त करण्यात आला होता.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक – २३९५-बी/२०२३ दि. ११/१०/२०२३)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत संबंधीताना तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली **पुर्ण रक्कम १,३२,०००/- त्यांचे मुळ खात्यावर** परत मिळविण्यात आली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Credit Card संदर्भातील माहिती कोणाकडेही उघड करु नये**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **अनोळखी फोन धारकांची पडताळणी केल्याशिवाय कॉल प्रतिसाद देवू नका.**
- **आपले बँक/ केडिट/ डेबिट कार्डाची माहिती अपडेट करण्याकरीता समक्ष बँकेत संपर्क साधावा.**
- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे इंटरनॅशनल ट्रॅन्झॅक्शन झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पोउनि/ प्रसाद शेनोळकर, पोअं/१२०९५ गणेश इलग, मपोअं/१३१०४ पल्लवी निकम यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**
**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**